**"करिअर घडत नाही तर घडवावं लागतं"** – नामांकित कंपनीच्या एचआरचे विद्यार्थ्यांना सल्ला.

केसीई आयएमआर मध्ये एचआर कॉनक्लेवचे आयोजन

केसीई संस्थेच्या इन्स्टिट्यूट ऑफ मेनेजमेंट एंड रिसर्च मध्ये एमबीए आणि एमसीएच्या विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय ऑनलाइन एचआर कॉनक्लेवचे १७ आणि १८ डिसेंबरला आयोजन करण्यात आले होते. ह्या कॉनक्लेव मध्ये एकूण पाच ट्रेनर्स आणि एचआर ने सहभाग घेतला, ज्यात पहिल्या दिवशी चेनईच्या ग्रेट लर्निंगचे डॉ. सरथ कृष्णन जी., गुडगांवच्या आयबीसीएल इंटरनॅशनलचे एचआर हेड वंशज डांगी तसेच सेंट्रोनिक्सच्या एचआर हेड शिखा जैन ह्यांनी विद्यार्थ्यांना कॉर्पोरेट इंटरव्ह्यू, स्कील डेव्हेलपमेंट, एचआर पॉलिसी आणि प्रेसेंटेशनवर मार्गदर्शन केले तसेच जळगांवचे विद्यार्थी कश्याप्रकारे एका नामांकित आंतरराष्ट्रीय कंपनीत नोकरी मिळवण्याची तयारी करू शकता ह्यावरही मार्गदर्शन केले. तर कॉनक्लेवच्या दुसऱ्या दिवशी टाटा ग्रुप स्ट्राईवचे टेलेंट एंड प्लेसमेंट मोबीलायझेशन हेड सुबोध जाधव ह्यांनी करिअरचे स्वप्न आणि एचआरची जगतची वास्तविकता ह्यावर मार्गदर्शन केले तसेच कशाप्रकारे जळगांवचे विद्यार्थी मुंबई-पुण्याच्या विद्यार्थ्यांप्रमाणे स्वतःला सक्षम बनवू शकता ह्यावरही टिप्स दिल्या तर दुसऱ्या दिवसाच्या अंतिम सत्रात सेटर्डे क्लबच्या आणि मुंबई स्थित एमिनेंट एचआर कन्सल्टिंगच्या संचालिका नीतू सुवर्णा ह्यांनी कॉर्पोरेट कंपनीच्या इंटरव्ह्यूची तयारी कशी करावी, कशाप्रकारे प्रभावीरीत्या ऑनलाइन इंटरव्ह्यू द्यावा, नोकरी मिळाल्यानंतर कामाचे स्वरूप कसे असावे आणि प्रमोशनसाठी कशी तयारी ठेवावी ह्यावर सत्र घेतले. दोन दिवसीय कॉनक्लेवमध्ये एकूण ६८९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

तसेच ह्यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना कोविड नंतर उद्भवलेल्या स्थितीत नोकरी कशी मिळवावी आणि कशी टिकवावी ह्यावर देखील मार्गदर्शन केले तसेच करिअर घडत नाही नाही तर घडवावे लागते हा देखील मोलाचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. ह्या कॉनक्लेवसाठी इन्स्टिट्यूटच्या संचालिका डॉ. शिल्पा बेंडाळे ह्यांनी मार्गदर्शन केले, डॉ. पराग नारखेडे ह्यांनी परिचय सादर केले तर ट्रेनिंग एंड प्लेसमेंट हेड प्रा. पुनीत शर्मा ह्यांनी कॉनक्लेवचे आयोजन केले.

कॉनक्लेवमधील प्रमुख मुद्दे

१. कोविड स्थितीनंतर इंटरव्ह्यू ऑनलाइन झाल्याने तयारीचे स्वरूप देखील बदलावे लागेल
२. आजही अनेक कॉर्पोरेट कंपन्यात मोठ्या प्रमाणात नोकऱ्या उपलब्ध आहेत पण त्याअनुरूप विद्यार्थी नाहीयेत, त्यामुळे स्वतःला घडविण्याची गरज आहे.
३. इंग्रजी ही कला नसून एक भाषा आहे तरी तिचे ज्ञान असणे हे आजच्या युगात आवश्यक आहे
४. ज्या कंपनीत नोकरी करणार असाल त्या कंपनीची सविस्तर माहिती असणे अनिवार्य आहे
५. रेज्युमे कुठून कॉपी केलेला नव्हे तर स्वतः बनविलेला असावा.